लोकमत | मुंबई
शुक्रवार, दि. १ फेब्रुवारी २०१३

# Hello मुंब

आहे. मात्र गेल्या तीस वर्षांपासून मुंबई पालिकेने एकही नवा परवाना जारी केलेला नाही. फेरीवाल्यांच्या व्यवसायात १ लाख फेरीवाले महाराष्ट्रीयन आहेत. दुर्दैव म्हणजे तीन लाख फेरीवाल्यांपैकी केवळ आठ हजार फेरीवाल्यांकडे परवाना असून, त्यामुळे उर्वरित फेरीवाल्यांची अवस्था दयनीय आहे.

एपीएमसी मार्केटमध्ये दिवसाला १ हजार ५०० टन भाजीपाला विकला जात असून, उर्वरित फेरीवाल्यांकडून दिवसाला १ हजार टन भाजीपाल्याची विक्री केली जात आहे. मुंबई शहरात सुमारे शंभर भाजी मार्केट असून,

फेरीवाल्यांना जाचाला सामोरे जावे लागणार नाही.

शहराची लोकसंख्या मात्र वेगाने वाढते आहे. परिणामी वाढत्या लोकसंख्येच्या तुलनेत येथे असलेले भाजी मार्केट अपुरे आहेत. विशेष म्हणजे १९९८ सालापासून महापालिकेने भाडेपावतीही घेणे बंद केले आहे. त्याशिवाय महापालिकेने विनाफेरीवाला क्षेत्र आणि फेरीवाला क्षेत्र आखली आहेत. मात्र त्याची अंमलबजावणी झालेली नाही, इत्यादी बाबी हेगडे यांनी मुख्यमंत्र्यांना भेटीदरम्यान निदर्शनास आणून दिल्या.

# आरे कॉलनीत बि

मुंबई | दि. ३१ (प्रतिनिधी)

**आरे** कॉलनीमधील आदर्शनगर येथे बसवण्यात आलेल्या सापळ्यात अखेर बिबट्या जेरबंद करण्यात आला. वनअधिकाऱ्यांच्या या कारवाईमुळे नॅशनल पार्कशेजारील वस्त्यांमध्ये राहणाऱ्या स्थानिकांनी सुटकेचा निश्वास सोडला आहे.

आरे कॉलनी येथील आदर्शनगरमध्ये राहणाऱ्या सौरभ लक्ष्मण ठाकूर या १३ वर्षांच्या मुलाला बिबट्याने नुकतेच ठार केले होते. या घटनेनंतर येथे बिबट्याची दहशत पसरली होती. आदर्शनगर येथील स्थानिकांकडून मिळालेल्या माहितीनुसार वनविभागाने आदर्शनगर परिसरात पिंजरा बसवला होता. गेल्या चार दिवसांपासून बिबट्या वनविभागाला चकवा देत होता. अखेर

### न्यायालयाकडून हिरवा कंदील मिळाल्याने पर्यटनस्थळाचा विकास होणार

# माथेरान रोप-वे आता दृष्टिपथात

विजय मांडे | दि. ३१ (कर्जत)

**सर्वोच्च** न्यायालयाकडून हिरवा कंदील मिळाल्यानंतर माथेरानकरिता रोप-वे उभारण्यासाठी मे. माथेरान रोप-वे प्रायव्हेट लिमिटेड या कंपनीला विकासक म्हणून जाहीर करण्याची अंतिम अधिसूचना प्रसिद्ध केली आहे. माथेरानचा रोप-वे प्रकल्प आता दृष्टिपथात आल्याने या पर्यटनस्थळाचा विकास होणार आहे.



### प्रकल्पाची किंमत वाढली

२००१ मध्ये रोप-वे प्रकल्प प्रस्तावित होता. त्यासाठी सरकारने ३ डिसेंबर २००३ रोजी अधिसूचना काढून हरकती सूचना मागविल्या होत्या. २०१३ साल उजाडले तरी अंतिम परवानगी मिळत नाही. आता रोप-वे प्रकल्प दृष्टिपथात आला असला तरी या प्रकल्पाच्या मूळ रकमेत मोठी वाढ झाली आहे. त्यामुळे विदेशातील सर्वोत्तम तंत्रज्ञान वापरून परवडणाऱ्या किमतीमध्ये रोप-वेची सेवा उपलब्ध करून देण्याचे मोठे आव्हान असेल, असे कंपनीच्या दिलीप कोठारी यांनी स्पष्ट केले. हा प्रकल्प नयनरम्य अशा या पर्यटनस्थळाच्या विकासाचा मार्ग ठरेल, असेही त्यांनी सांगितले.

माथेरानसाठी रोप-वे करण्याची योजना विनयचंद कोठारी यांनी २००१ मध्ये आणली. त्यासाठी माथेरान रोप-वे प्रा. लि. या कंपनीची स्थापना करण्यात आली. पर्यावरणपूरक वाहतूक व्यवस्थेच्या दृष्टीने या प्रकल्पाची नितांत आवश्यक असून माथेरान नगरपालिकेसह स्वयंसेवी व व्यावसायिक संघटनांनी या प्रकल्पाला एकमुखी पाठिंबा जाहीर केला होता. मात्र त्याच वेळी माथेरान पर्यावरणदृष्ट्या संवेदनशील क्षेत्र जाहीर करण्याच्या हालचाली सुरू झाल्या व रोप-वे प्रकल्प त्यामध्ये अडकला.

या संदर्भात सेंट्रल एम्पॉवर्ड कमिटीकडे सुनावण्या झाल्यानंतर प्रकल्पाला हिरवा कंदील मिळाला. विकासक म्हणून मे. माथेरान रोप-वे प्रा. लि. कंपनीची अंतिम अधिसूचना प्रसिद्ध केली आहे. यासंदर्भात अंतिम अधिसूचना व परवानगी मिळाल्यानंतर दोन वर्षांत प्रकल्प पूर्ण करण्याचे बंधन घातले आहे.

## मधुमेह (डायबेटीस) साठी ५१ दिवसाचे औषध

आधार आयुर्वेदचे डॉ. प्रसाद जाधव मुंबई व ठाणे येथे

आजकाल ताणतणावग्रस्त जीवनशैली, असंतुलित आहार पध्दती यामुळे मधुमेह या व्याधीचे प्रमाण दिवसेंदिवस वाढत चालले आहे

चिकित्सा अश्या रुग्णांना पर्वनीय ठरत आहे. ''आधार आयुर्वेद'' च्या मधुमित्र चिकित्सेमध्ये रुग्णांचा

काम करण्याची इच्छा नसणे, आळसवाणी जीवन वाटणे, किंवा सततची चिडचिड होणे हि लक्षणे